दैनिक
माणदूत एक्सप्रेस
09 Jan 2023 - Page 4

# सांगोला तालुक्यात शाळा व महाविद्यालयात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न



कोळा (वार्ताहर):- डिजिटलायझेशनच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा सोबतच मोबाईल' ही मुलभुत गरज झालेली असून इंटरनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हयामध्ये काही पटीने वाढ झालेली दिसुन येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये सायबर मुळे आणि त्याबाबतीत सुरक्षा सांगोला तालुक्यात अनेक शाळा व महाविद्यालयात सायबर सुरक्षा या विषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सायबर क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्या सहयोगाने विषयावर विद्यार्थी-विद्यार्थिनी साठी कार्यशाला आयोजित केले.

सोलापूर विद्यापिठातील सायबर वॉरियर्स वैदेही श्रीकांत देशपांडे व रक्षा राजेश नेताळकर यांच्या नियोजनाखाली कार्यक्रम संपन्न झाला.

सोलापूर विद्यापिठातील सायबर शाखेच्या विद्यमाने कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी उपयोगी आणि उत्कृष्ट मार्गदर्शन केले. सायबर क्राइम कोण कोणते आणि ते कशा प्रकारे घडतात वाढल्या सोशल मिडियाच्या वापरातून ऑनलाइन फसवणुक कशी होते, फ्री ॲप द्वारे डेटा चोरी कसा होतो, याबाबत सर्विस्तर माहिती सांगितली. विविध ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतःला कसे सुरक्षित ठेवावे, कोणती दक्षता घ्यावा, मोबाईलमध्ये टू स्टेप व्हेरिफिकेशन करावे, ओटीपी इतरांना शेअर करू नये. लॅपटॉप, संगणक, मध्य ॲण्टीवायरस सॉफ्टवेअर इंस्टॉल करावे. याविषयी माहिती सांगितली. यावेळी इंटरनेट, मोबाइलचा योग्य वापर करण्यासाठी सर्वांना शपथ दिली.